नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १९८ | Issue - 198 | वार गुरुवार दि. ५ डिसेंबर २०२४ | Blow- Thursday Date 5 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# देवेंद्र फडणवीस घेणार मुख्यमंत्रिपदाची शपथ



## अमित शाह यांचेही विशेष आभार मानतो : फडणवीस ; भाजपाचा एकही आमदार आपल्याला सोडून गेला नाही –फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महायुतीला विधानसभा निवडणुकांच्या निकालात स्पष्ट बहुमत मिळालं. महायुतीकडून मुख्यमंत्री कोण? यावर गेले अनेक दिवस खलबतं सुरू होती. महाराष्ट्राचा नवा मुख्यमंत्री कोण होणार? याचं उत्तर अवघ्या महाराष्ट्राला मिळालं आहे. भाजपा नेते देवेंद्र फडणवीसच आता राज्याच्या मुख्यमंत्रिपदी विराजमान होणार आहेत, हे स्पष्ट झालं आहे. आज झालेल्या भाजपा कोअर कमिटी बैठक आणि भाजप विधीमंडळ पक्ष बैठकीत भाजपच्या विधीमंडळ पक्ष-नेतेपदी निवड करण्यात आली. त्यामुळे फडणवीस हेच मुख्यमंत्री होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे. देवेंद्र फडणवीस ( ऊर्शींशपवीर ऋुवपर्रींळी ) यांनी जे भाषण केलं त्यात २०१९ बाबत महत्त्वाचा उल्लेख केला.

५ डिसेंबर रोजी फडणवीस यांचा आझाद मैदानावर दिमाखदार शपथविधी सोहळा पार पडणार आहे. दरम्यान, विधीमंडळ पक्ष-नेतेपदी निवड झाल्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी विधीमंडळाच्या सेंट्रल हॉलमध्ये आपलं पहिलं भाषण केलं. या भाषणात त्यांनी त्यांच्यासोबत महायुतीच्या गेल्या सरकारमध्ये असलेल्या एकनाथ शिंदे, अजित पवार यांचे आभार मानले.

२०१९ ला आपल्याला बहुमत मिळालं होतं पण..

**५ डिसेंबरला देवेंद्र फडणवीस यांचा शपथविधी**


देवेंद्र फडणवीस म्हणाले, २०१९ ला आपल्याला जनतेचा कौल मिळाला होता. दुर्दैवाने जनतेचा कौल हिसकावून घेण्यात आला आणि जन-तेशी बेईमानी झाली. मी त्या इतिहासात जात नाही एक नवीन सुरुवात आपण करतो आहे. पण या गोष्टीचा निश्चित उल्लेख करेन की २०१९ च्या अडीच वर्षांत आपल्याला, आपल्या आमदारांना, नेत्यांना त्रास देण्यात आला. तरीही कुणीही आपल्याला सोडून गेलं नाही.

२०१९ ते २०२२ या अडीच वर्षांच्या काळात एकही आमदार आपल्याला सोडून गेला नाही. सगळे आमदार, सगळे नेते संघर्ष करत होते. त्यानंतर २०२२ मध्ये आपलं सरकार आलं. त्यानंतर आता पूर्ण बहुमत मिळालं. महायुतीला २३० हून जास्त जागा मिळाल्या. हा इतिहास अभूतपूर्व असा आहे. मी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मी आभार मानेन. बूथ कार्यकर्ता म्हणून ज्याने सुरुवात केली अशा माझ्यासारख्या कार्यकर्त्याला मोदींनी संधी दिली. हा पक्ष नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात मोठा झाला आणि आपल्याला काम करण्याची संधी मिळाली त्यामुळे मी आदरणीय मोदी यांचे आभार मानतो. तसंच पक्षाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचेही आभार मानतो असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्रात आपल्याबरोबर, कार्यकर्त्यांबरोबर राहून ज्यांनी आपल्याला ताकद दिली ते देशाचे गृहमंत्री अमित शाह यांचे, तसंच भाजपाच्या सगळ्याच नेत्यांचे मी मनापासून आभार मानतो. राज्यातले कार्यकर्ते आणि नेते यांनी आपल्याला जी मदत केली त्यांचेही मी आभार मानतो. महाराष्ट्र भाजपा पूर्ण ताकदीने मैदानात उतरला होता. महाराष्ट्रातल्या भाजपाच्या सगळ्या टीमचं मी अभिनंदन करतो. तुम्ही सगळे आहात म्हणून मी इथे आहे असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. पुढची वाट ही अपेक्षा पूर्ण करण्यासाठी संघर्षाची आहे. आपलं महायुतीचं सरकार आहे. एकदिलाने सगळ्या मित्रांना बरोबर घेऊन पुढे जायचं आहे. सगळ्यांच्या मनातल्या सगळ्या गोष्टी पूर्ण करता येत नाहीत. आपण एक मोठं लक्ष्य घेऊन या ठिकाणी आलो आहोत. येत्या काळात चार गोष्टी मनासारख्या झाल्या तर चार गोष्टी मनाविरुद्धही होतील तरीही आपण संपूर्ण शक्तीने काम करु असं आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांचा सरकारला घरचा आहेर; शेतकरी आंदोलनावरून कृषी मंत्र्यांना सुनावले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : दिल्ली-नोएडा सीमेवर पुन्हा एकदा शेतकऱ्यांनी आंदोलन सुरू केल्याच्या पार्श्वभूमीवर देशाचे उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांनी कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांना खडे बोल सुनावले. सरकारने शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनांचे काय झाले? असाही सवाल धनकड यांनी विचारला. मुंबई येथे एका कार्यक्रमात बोलत असताना शेतकऱ्यांच्या आंदोलनाप्रती चिंता व्यक्त केली. आपण शेतकरी आणि सरकारमध्ये सीमा आखत आहोत का? आजवर शेतकऱ्यांशी संवाद का साधला गेला नाही? असे प्रश्न जगदीप धनकड यांनी उपस्थित केले.

मी शेतकऱ्यांना आवाहन करू इच्छितो की, तुम्ही अर्थव्यवस्थेचा कणा आहात. राजकारणावर तुमचा प्रभाव आहे. समाजाचे तुम्ही आधारास्तंभ आहात. तुम्हालाही संवादासाठी पुढे यावे लागेल. पण कृषी मंत्र्यांना मी एक चिंतेचा विषय सांगू इच्छितो की, तुम्ही आतापर्यंत शेतकऱ्यांशी संवाद का नाही साधला. मला सरदार वल्लभभाई पटेल यांची आठवण येत आहे. देशाला एकत्र ठेवण्याची जबाबदारी त्यांनी लिलया पार पाडली. आज तसेच आव्हान शिवराज सिंह चौहान यांच्यासमोर आहे. हे देशाची एकता अबाधित ठेवण्याएवढेच आव्हान आहे. त्याला कमी समजू नये, असेही ते म्हणाले. शेतकरी आंदोलन जेवढे रस्त्यावर दिसते, तेवढेच नाही. शेतकऱ्याचा मुलगा आज अधिकारी आहे, तो सुरक्षा दलात आहे. म्हणूनच लाल बहादूर शास्त्री यांनी जय जवान, जय किसानचा नारा दिला होता. त्यामुळे शेतकऱ्यांप्रती आमचा दृष्टीकोन जवानांसारखाच असला पाहीजे, असे आवाहन जगदीप धनकड यांनी केले. जगदीप धनकड यांनी काल शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आपल्याच सरकारला खडे बोल सुनावले. पण आज राज्यसभेत काँग्रेसचे खासदार प्रमोद तिवारी यांनी शेतकऱ्यांचा प्रश्न उपस्थित केला. त्यावर मात्र जगदीप धनकड यांनी आक्षेप घेतला. केंद्र सरकार शेतकऱ्यांची शत्रू आहे, असा आरोप तिवारी यांनी केला होता. त्यावर हे संसदीय शब्द असल्याचे धनकड यांनी सांगितले.

## ‘एक है तो सेफ है’ आणि ‘मोदी है तो मुनकीन है’ : देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भाजप विधीमंडळ गटनेता म्हणून देवेंद्र फडणवीस यांची निवड झाली आहे. सर्व आमदारांनी त्यांची निवड केल्याने आता महायुतीमध्ये देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री असणार आहेत. बुधवारी सकाळी देवेंद्र फडणवीस यांची विधीमंडळामध्ये गटनेतेपदी निवड झाली आहे. फडणवीसांची गटनेता म्हणून निवड झाल्यावर आपल्या पहिल्या भाषणामध्ये त्यांनी पक्ष नेतृत्त्वाचे आभार मानले. जनादेशाबाबत इतकंच म्हणेल आनंद आहे पण आता जबाबदारी वाढली असून महाराष्ट्राच्या जनतेला साष्टांग दंडवत असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

एकमताने विधीमंडळ गटाचा नेता म्हणून निवड केल्याबद्दल सर्वांचे आभार. यावेळची निवडणुक अतिशय ऐतिहासिक होती. या निवडणुकीने एक गोष्ट आपल्यासमोर ठेवली आहे ती म्हणजे 'एक है तो सेफ है' आणि 'मोदी है ते मुनकीन है'. मोदींच्या नेतृत्त्वामध्ये विजयाची मालिका लोकसभेनंतर हरियाणापासून सुरू झाली. महाराष्ट्राच्या जनतेला साष्टांग दंडवत घालतो अशा प्रकारंच मँडेट जनतेने आपल्याला दिलं आहे. आपल्यासोबत पूर्णपणे तनमनाने असलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मित्रपक्षांचे आभार. आपण ज्या संविधानाच्या प्रक्रियेतून निवडून येतो या संविधानाची ७५ वर्षे प्रूण होत आ-हेत. मोदी कायम सांगतात कोणत्याही




धर्मग्रंथापेक्षा भारताचे संविधान माझ्यासाठी महत्त्वाचं आहे. जनतेने मोठा जनादेश दिला आहे. आता या जनादेशाबाबत इतकंच म्हणेल आनंद आहे पण आता जबाबदारी वाढली आहे. सगळ्यांनी दिलेल्या जनादेशाचं सन्मान राखण्याचं काम आपल्याला करावं लागणार असल्याचं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. आपल्याला अपेक्षा पूर्ण करायच्या आहेत. त्यामुळे महायुती सरकारमध्ये आपल्याला सर्वांना एकत्र घेऊन आणि प्रसंगी सगळ्या गोष्टी सर्वांच्या मनाच्या करता येत नाहीत. पदांकरता आपण राजकारणात आलेलो नाही. त्यामुळे चार गोष्टी मनासारख्या आणि मनाविरूद्ध होतील. पण तरीदेखील आपण सगळेत एकत्रितपणे काम करू आणि आपली शक्ती काय आहे ते दाखवून देऊ. महाराष्ट्रातील सर्व समाजाला अश्वस्त करतो आमचं सरकार २४ तास काम करेल, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितलं. महाराष्ट्राला सर्व आघाड्यांवर पुढे आणण्याकरता आपल्याला सातत्याने काम करावं लागणार आहे. २०१९ ला बेईमानी झाली पण जुन्या गोष्टींचा उल्लेख करणार नाही. पण गेला नाही. त्यावेळी सगळे आमदार संघर्ष करत होते. मात्र एकही आमदार आपल्याला सोडून गेला नाही. महाराष्ट्रात एक अभूतपूर्व इतिहास लिहिला गेला. माझ्यासारख्या बूथचा कार्यकर्ता म्हणूम काम सुरू केलेल्या कार्यकर्त्याला मोदींनी मला मुख्यमंत्रिपदावर बसण्याचा सन्मान दिला त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार. त्यासोबतच जे. पी. नड्डा आणि या निवडणुकीमध्ये सुरूवातीपासून अतिशय ताकदीने महाराष्ट्रात तळ ठोकून कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण केली ते अमित शहांचेही आभार देवेंद्र फडणवीस यांनी मानले.

## महाराष्ट्रातील निवडणुकीच्या निकालाचं हा विजय विकसित भारतासाठी स्पष्ट संदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा करण्यात आली असून भाजपाच्या बैठकीत हा ठराव मांडण्यात आला होता, ज्याला भाजपाच्या सर्व आमदारांनी व दिल्लीतल्या नेतृत्वाने पाठवलेल्या निरिक्षकांनी समर्थन दिलं आहे. या कार्यक्रमाला भाजपा नेत्या व केंद्रीय वित्तमंत्री निर्मला सीतारामण देखील उपस्थित होत्या. यावेळी सीतारामण यांनी सर्व नवनिर्वाचित आमदारांचं अभिनंदन केलं. तसेच विधीमंडळ नेतेपदी नियुक्ती



झालेल्या देवेंद्र फडणवीसांचं अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी त्या म्हणाल्या, नुकत्याच झालेल्या महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत राज्यातील १४ कोटी जनतेने एकमताने देशाला संदेश दिला आहे की त्यांना विकसित भारत हवा आहे. महाराष्ट्राची निवडणूक काही साधीसुधी नव्हती. लोकसभेनंतर झा-लेली ही महत्त्वाची विधानसभा निवडणूक होती. त्यामुळे संपूर्ण देशाचं लक्ष या निवडणुकीकडे लागलं होतं. निर्मला सीतारामण म्हणाल्या, लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्राच्या व हरियाणाच्या जनतेने स्पष्ट संदेश दिला आहे. निवडणुकीनंतर अनपेक्षित व अभूतपूर्व असा निकाल समोर आला आहे.

(पान २ वर..)

## सुवर्ण मंदिराबाहेर सुखबीर सिंग बादल यांच्यावर गोळीबार!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अमृतसर/पंजाब : पंजाबमधील अमृतसर येथे सुवर्ण मंदिराच्या प्रवेशद्वारावर शिरोमणी अकाली दलाचे नेते सुखबीर सिंग बादल यांच्यावर एका व्यक्तीने गोळीबार केल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यात सुखबीर सिंग बादल हे अगदी थोडक्यात बचावले आ-हेत. दरम्यान या घटनेचा व्हिडीओ देखील समोर आला असून या गोळीबाराच्या घटनेनंतर उपस्थित लोकांनी गोळीबार करणाऱ्या व्यक्तीला ताब्यात घेतले. मात्र हा गोळीबार का करण्यात आला याबद्दल अद्याप माहिती मिळू शकलेली नाही.



या व्हिडीओमध्ये निळ्या रंगाचा सेवादारांचा पेशाख घातलेले बादल त्यांच्या व्हील चेअरवर बसललेले दिसत आहेत. सोमवारी (२ डिसेंबर) बादल यांना ‘अकाल तख्त’कडून धार्मिक शिक्षा देण्यात आली आहे. त्यामुळे पाय फ्रॅक्चर असलले बादल हे व्हिलचेअरवर (पान २ वर..)

**शपथविधी सोहळ्यासाठी किमान पाच अतिरिक्त पोलिस आयुक्त**

**१५ पोलिस उपायुक्त आणि २९ सहायक पोलिस आयुक्त तैनात**

# साडेतीन हजार पोलिसांवर शपथविधीची भिस्त



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात स्थापन होणाऱ्या नवनिर्वाचित मंत्रीमंडळाचा शपथविधी सोहळा आझाद मैदानात गुरूवारी आझाद मैदानात होत आहे. त्यानिमित्ताने मुंबईत कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. देवेंद्र फडणवीसांची आजच विधिमंडळ पक्षाचा गटनेता म्हणून निवड झाली आहे. त्यामुळे ते उद्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील. तसंच, दोन उपमुख्यमंत्री शपथ घेणार असल्याची चर्चा आहे. या शपथविधी सोहळ्याला अतिमहत्त्वाच्या व्यक्ती उपस्थित रा-हणार असल्याने आझाद मैदान व आसपासच्या परिसरात जोरदार तयारी सुरू आहे. शपथविधी सोहळ्यासाठी मुंबई पोलिसांनी दक्षिण मुंबईतील आझाद मैदानाच्या परिसराभोवती व्यापक सुरक्षा व्यवस्था केली आहे. पोलिसांनी सांगितले की, मोठ्या संख्येने नागरिक, मान्यवर आणि अति महत्त्वाचे व्यक्ती या कार्यक्रमाला उप-स्थित राहण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांना शहरात कडक सुर-क्षा आणि कायद्याची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यास सांगितले आहे.

**मुंबईत सुरक्षा व्यवस्था चोख**

मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी संध्याकाळी ५ वाजता होणाऱ्या शपथविधी सोहळ्यासाठी किमान पाच अतिरिक्त पोलिस आयुक्त, १५ पोलिस उपायुक्त आणि २९ सहायक पोलिस आयुक्त तैनात करण्यात येणार आहेत. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

याशिवाय ५२० पोलीस अधिकारी आणि साडेतीन हजार कॉन्स्टेबल सुरक्षेसाठी तैनात करण्यात येणार आहेत. सोहळ्यादरम्यान वाहनांची वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी एक अतिरिक्त पोलीस आयुक्त, तीन पोलीस उपायुक्त, ३० पोलीस अधिकारी आणि २५० इतर कर्मचारी यांचा समावेश अस-लेली टीम नियुक्त केली जाईल.

मुंबई पोलीस आयुक्त आणि विशेष पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली, शहराचे सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) यांनी कार्यक्रमादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी विस्तृत सुरक्षा योजना आखली आहे, असं मुंबई पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले. सुरक्षा उपायांचा एक भाग म्हणून, राज्य राखीव पोलीस दल (डठझऋ) पलटण, क्विक रिस्पॉन्स टीम, दंगल-नियंत्रण पथके, डेल्टा, लढाऊ आणि बॉम्ब शोध आणि निकामी पथके यासारख्या विशेष तुकड्याही महत्त्वाच्या ठिकाणी तैनात केल्या जातील.

शपथविधीच्या पार्श्वभूमीवर आवश्यकतेनुसार महानगरपालिका मार्ग:- छत्रपती शिवाजी महाराज जंक्शन (सीएसएमटी जंक्शन ) ते वासुदेव बळवंत फडके चौक (मेट्रो जंक्शन) दरम्यान दोन्ही वाहिन्या बंद ठेवण्यात येतील. तेथून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी एल. टी. मार्ग, चकाला जंक्शनवरून उजवे वळण - डी. एन. रोड छत्रपती शिवाजी महाराज - जंक्शन (सीएसएमटी जंक्शन) या पर्यायी मार्गाचा वापर करावा.

## संपादकीय....

### समंदर लौट आया!

महाराष्ट्रातील मुख्यमंत्र्यांच्या नावावरून असलेला सस्पेंस संपला आणि देवेंद्र फडणवीसच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतील यावर शिक्कामोर्तब झाला आहे. फडणवीस तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार असून आता त्यांच्या राज्याभिषेकाची जय्यत तयारी सुरू आहे. 'मेरा पानी उतरता देख मेरे किनारे पर घर मत बसा लेना, मैं समंदर हूं, लौटकर वापस आऊंगा' विदर्भातून महाराष्ट्राच्या राजकारणात स्थान मिळवलेले देवेंद्र फडणवीस नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघातील भाजपचे विजयी नेते देवेंद्र फडणवीसच राज्याचे नवीन मुख्यमंत्री होणार यावर शिक्काम ोर्तब झाला आहे. 'मेरा पानी उतरता देख मेरे किनारे पर घर मत बसा लेना. मैं समंदर हूं, लौटकर वापस आऊंगा,' ही ओळ देवेंद्र फडणवीस यांनी २०१९ साली सांगितली होती. आज देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रीपदी निवडून आले आणि पाच वर्षे जुनी ओळ अगदी बरोबर असल्याचे सिद्ध होत आहे. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राच्या राजकारणात पूर्ण दर्जा आणि प्रभावाने परतले आहेत. विधानसभा निवडणूक अपेक्षेपेक्षा घवघवीत यश मिळाल्यानंतर महाराषट्राची सूत्रे देवेंद्र फडणवीसांच्या हाती देण्याचा महायुतीकडून अंतिम निर्णय करण्यात आला असुंन असून भाजप विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत त्यांच्या नावाला मंजुरी देण्यात आली. देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार आहेत. एकनाथ शिंदे यांनी त्यांना काही काळ अस्वस्थ केले तरी, फडणवीस आपल्या म्हणण्यावर ठाम राहिले. मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत त्यांनी शरणागती पत्करली नाही आणि शेवटी मुख्यमंत्रीपदाची शर्यत जिंकली. जाणून घेऊया कोण आहेत देवेंद्र फडणवीस आणि त्यांचा राजकीय प्रवास कसा होता. फडणवीस महाराष्ट्राच्या राजकारणात भाजपच्या उगवत्या सूर्यासारखे आहेत.

# महायुतीच्या विजयाचे शिल्पकार अखेर मुख्यमंत्रिपदी, देवा भाऊंच्या पाच वर्षांच्या संघर्षाला यश

## देवेंद्र फडणवीस यांचा राजकीय प्रवास; फडणवीस यांचा अनोखा रेकॉर्ड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रातील मुख्यमंत्र्यांच्या नावावरून असलेला सस्पेंस संपला आणि देवेंद्र फडणवीसच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतील यावर शिक्कामोर्तब झाला आहे. फडणवीस तिसऱ्यांदा म हाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार असून आता त्यांच्या राज्याभिषेकाची जय्यत तयारी सुरू आहे. 'मेरा पानी उतरता देख मेरे किनारे पर घर मत बसा लेना, मैं समंदर हूं, लौटकर वापस आऊंगा'

मुंबई : विदर्भातून महाराष्ट्राच्या राजकारणात स्थान मिळवलेले देवेंद्र फडणवीस नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघातील भाजपचे विजयी नेते देवेंद्र फडणवीसच राज्याचे नवीन मुख्यमंत्री होणार यावर शिक्काम ोर्तब झाला आहे. 'मेरा पानी उतरता देख मेरे किनारे पर घर मत बसा लेना. मैं समंदर हूं, लौटकर वापस आऊंगा,' ही ओळ देवेंद्र फडणवीस यांनी २०१९ साली सांगितली होती. आज देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रीपदी निवडून आले आणि पाच वर्षे जुनी ओळ अगदी बरोबर असल्याचे सिद्ध होत आहे. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राच्या राजकारणात पूर्ण दर्जा आणि प्रभावाने परतले आहेत.

विधानसभा निवडणूक अपेक्षेपेक्षा घवघवीत यश मिळाल्यानंतर महाराषट्राची सूत्रे देवेंद्र फडणवीसांच्या हाती देण्याचा महायुतीकडून अंतिम निर्णय करण्यात आला असुंन असून भाजप विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत त्यांच्या नावाला मंजुरी देण्यात आली. देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार आहेत. एकनाथ शिंदे यांनी त्यांना काही काळ अस्वस्थ केले तरी, फडणवीस आपल्या म्हणण्यावर ठाम राहिले. मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत त्यांनी शरणागती पत्करली नाही आणि शेवटी मुख्यमंत्रीपदाची शर्यत जिंकली. जाणून घेऊया कोण आहेत देवेंद्र फडणवीस आणि त्यांचा राजकीय प्रवास कसा होता.

फडणवीस महाराष्ट्राच्या राजकारणात भाजपच्या उगवत्या सूर्यासारखे आहेत. फडणवीसांच्या नेतृत्वात भाजपने राज्यात २०१४ मध्ये सत्तास्थापनेचा दुष्काळ संपवला आणि आपल्या कार्यकाळाची पाच वर्षे पूर्ण करणारे भाजपचे एकमेव मुख्यमंत्री ठरले. देवेंद्र फडणवीस यांचा राजकीयप्रवास आमदार किंवा मुख्यमंत्री पदापासून सुरू झालेला नाही तर लहान वयापासूनच राजकारणात सक्रिय होते.

अखिल भारतीय विध्यार्थी परिषदेचे (अभाविप) सक्रिय सदस्य म्हणून फडणवीस यांनी मोलाची भूमिका बजावली तर अभाविपचे सदस्य असतानाच सर्वप्रथम महापालिका सभागृहात नगरसेवक झाले. त्यानंतर अवघ्या पाच वर्षांनी नागपूरचे महापौर झाले. त्यांनी मराठा आंदोलन चांगल्या पद्धतीने हाताळले ही त्यांची क्षमता आहे.

वयाच्या ४४ व्या वर्षी फडणवीस राज्याचे दुसरे सर्वात तरुण मुख्यमंत्री बनले असून १९९९ आणि २०१४ मध्ये दक्षिण नागपूर मतदारसंघातून आमदार झाल्यानंतर भाजपने आपला नेता म्हणून त्यांची निवड केली. १९६० मध्ये राज्याच्या निर्मितीनंतर १७ वेगवेगळे मुख्यमंत्री बनले पण केवळ दोनच कार्यकाळ पूर्ण करू शकले आणि देवेंद्र फडणवीस त्यापैकी आहेत. याआधी केवळ काँग्रेसचे वसंतराव नाईकच त्यांचा कार्यकाळ पूर्ण करू शकले होते. त्याचवेळी, फडणवीस यांचा संघाशी सक्रिय संबंध राहिला असून गेल्या तीन दशकापासून सक्रिय राजकारणात आहेत. तसेच सर्वात कमी कालावधीसाठी मुख्यमंत्री राहण्याचा रेकॉर्डही फडणवीसांच्या नवे आहे. २०१९ मध्ये मुख्यमंत्री पदावरून शिवसेना आणि भाजपमध्ये कटुता आल्यावर फडणवीस यांनी पुनरागमनासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. एकेकाळी अजित पवारांचा पाठिंबा घेऊनकाही आमदार फोडून सरकार स्थापन करतील, असे वाटत होते. २३ नोव्हेंबर २९१८ रोजी त्यांनी शपथही घेतली पण शरद पवारांच्या रणनीतीला खीळ बसली आणि अजित पवारांनी यूटर्न घेतला. यामुळे अवघ्या ७२ तासांनी फडणवीसांना राजीनामा द्यावा लागला.

## सुवर्ण मंदिराबाहेर सुखबीर सिंग बादल यांच्यावर गोळीबार!

(पान १ वरून...) बसून सुवर्ण मंदिराबाहेर सेवा देत होते. दरम्यान या घटनेबद्दल पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोळीबार करणाऱ्या व्यक्तीचे नाव नारायण सिंग चौरा असून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. या हल्लयाम ागील कारण अद्याप समजू शकले नाही असेही पोलिसांनी स्पष्ट केले.

पंजाबमधील शिरोमणी अकाली दल (एसएडी) आणि पक्षाचे अध्यक्ष सुखबीर सिंग बादल यांच्यावर गंभीर आरोप करत 'अकाल तख्त'चे जथेदार ग्यानी रघबीर सिंग यांनी सोमवारी बादल आणि इतर वरिष्ठ नेत्यांना 'तनखा' (धार्मिक शिक्षा) ठोठावली. या शिक्षेचा एक भाग म्हणून, बादल आणि २०१५ पासून राज्यातील मंत्र्यांसह अकाली दलाच्या 'कोअर कमिटी' सदस्यांना शौचालये स्वच्छ करणे, लंगरमध्ये सेवा करणे, नितनेम (दररोज शीख प्रार्थना) करणे आणि सुखमनी साहिबचे पठण करण्याचे आदेश दिले आहेत.

दरम्यान, आरोग्याच्या तक्रारींमुळे सुखबीर बादल आणि सुखदेव सिंग धिंडसा यांना गुरूंच्या निवासस्थानी दोन दिवस द्वारपाल म्हणून काम करण्यास, पारंपरिक सेवक पोशाख घालून भाले धारण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. बादल हे तेव्हापासून सेवादार म्हणून सुवर्णमंदिरात सेवा देत आहेत.

## लोकसभेत रेल्वे (सुधारणा) विधेयक सादर; खासगीकरण न करण्याचे विरोधकांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय रेल्वेचे खासगीकरण होण्याचा धोका असल्याची भीती विरोधकांनी बुधवारी लोकसभेत व्यक्त केली. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत रेल्वे (सुधारणा) विधेयक सादर केले. त्यावर चर्चेदरम्यान विरोधकांनी संभाव्य खासगीकरणाचे तोटे, ज्येष्ठ नागरिकांच्या सवलती, वंदे भारतचे तिकीट दर इत्यादी मुद्दे उपस्थित केले. तर विधेयकाच्या मंजुरीनंतर रेल्वेची कार्यक्षमता वाढेल, असा दावा रेल्वेमंत्र्यांनी केला.



समाजवादी पक्षाचे खासदार नीरज मौर्य यांनी हे विधेयक मांडण्यापूर्वी सर्वपक्षीय समितीकडे विचारविनिमयासाठी पाठवायला हवे होते असे सांगितले. ''रेल्वे ही कोट्यवधी जनतेची जीवनरेषा आहे. रेल्वेसाठी खासगीकरणाचा मार्ग निवडू नका,'' असे ते म्हणाले. तर हे विधेयक मंजूर झाल्यानंतर सरकार रेल्वेच्या खासगीकरणाचे मार्ग शोधेल अशी भीती काँग्रेसचे खासदार मनोज कुमार यांनी व्यक्त केली. ज्येष्ठ नागरिकांना दिल्या जाणाऱ्या आणि करोनाकाळात बंद केलेल्या सवलती पुन्हा सुरू कराव्यात अशी मागणी तृणमूल काँग्रेसचे बापी हल्दर यांनी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सामान्य श्रेणीच्या डब्यांना दिल्या जाणाऱ्या सेवांमध्ये वाढ करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे, असे वैष्णव विधेयक सादर करताना म्हणाले.

रेल्वे (सुधारणा) विधेयक २०२४ नुसार, भारतीय रेल्वे बोर्ड कायदा, १९०५ च्या तरतुदी रेल्वे कायदा, १९८९ मध्ये समाविष्ट करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे कायदेशीर चौकट सुलभ होईल आणि दोन कायद्यांचा संदर्भ घेण्याची गरज संपुष्टात येईल.

भारतीय रेल्वेकडून दरवर्षी सर्व श्रेणीतील प्रवाशांना मिळून एकूण ५६,९९३ कोटींचे अनुदान दिले जाते अशी माहिती वैष्णव यांनी विविध प्रश्नांना उत्तर देताना दिली. त्यानुसार, प्रत्येक तिकिटावर ४६ टक्के सवलत मिळते असे ते म्हणाले.

वैष्णव यांचे मुद्दे

संपुआच्या काळात दरवर्षी १७१ रेल्वे अपघात; २०२३-२४ मध्ये प्रमाण ४०वर

१० वर्षांमध्ये रेल्वेसाठी तरतुदीत वाढ; २०१४ मध्ये २९ हजार कोटी असलेली तरतूद आता २.५२ लाख कोटींवर

पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत १,३०० नवीन स्थानकांची पुनर्बांधणी

## महाराष्ट्रातील निवडणुकीच्या निकालाचं हा विजय विकसित भारतासाठी स्पष्ट संदेश

(पान १ वरून..) हा विजय विकसित भारतासाठी स्पष्ट संदेश आहे. मागील निवडणुकीनंतर राज्यातकाँग्रेसच्यानेतृत्त्वाखालील सरकार अस्तित्वात आलं होतं. मात्र त्या सरकारने जे काही करून ठेवलंय त्या अनुभवातूनच राज्यातील जनतेने यावेळी स्पष्ट संदेश दिला आहे. जुनं सरकार महाराष्ट्राच्या विकासाच्या मार्गात अडथळा निर्माण करत होतं. म्हणूनच जनतेने आम्हाला निवडलं आहे. जनतेच्या मनात काय आहे ते निवडणुकीच्या निकालावरुन समजलं आहे. म ला सर्वांना एकच गोष्ट सांगायची आहे की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखालील सरकार देशाला पुढे नेत आहे, त्याचप्रम ाणे महाराष्ट्र देखील प्रगती करत राहील.

मुख्यमंत्रीपदाचा मार्ग मोकळा होताच फडणवीस म्हणाले, सर्वप्रथम मी सर्व आमदारांचे आभार मानतो. सर्व आमदारांनी एकमताने माझी गटनेतेपदी निवड केली. खरं म्हणजे आपल्या सर्वांना कल्पना आहे की या वेळची निवडणूक ही ऐतिहासिक राहिली. या निवडणुकीने आपल्या समोर एक गोष्ट ठेवली. ती म्हणजे एक है तो सेफ है आणि मोदी है तो मुमकिन है. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात विजयाची मालिका ही लोकसभेनंतर पुन्हा एकदा हरियाणापासून सुरु झाली. म हाराष्ट्राने जे बहुमत आपल्याला दिलं. त्याबद्दल मी महाराष्ट्राच्या जनतेला साष्टांग दंडवत घालतो. खरं म्हणजे आपल्याबरोबर एकनाथ शिंदे आणि अजित पवार आहेत, त्यांचेही मी आभार मानतो.

**बेकायदेशीर जमाव जमवुन आदेशाचा भंग**

**मारकडवाडी येथे तणावपूर्ण शांतता**

# मारकडवाडी येथे जमावबंदी आदेश न पाळणाऱ्यांवर पोलिसांकडून गुन्हे दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मारकडवाडी चाचणी मतदान करण्यासाठी येथील ग्रामस्थांनी फेर चाचणी मतदान येण्याची मागणी तहसीलदार निवडणूक अधिकारी यांच्याकडे केली होती परंतु निवडणूक अधिकारी यांच्याकडून ही मागणी फेटाळण्यात आली होती तरीसुद्धा मतदान केल्यावर ग्रामस्थ ठाम होते. वर पोलीस प्रशासन यांनी कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी व अनुचित प्रकार घडू नय म्हणून १६३ अन्वय नाव बंदी आदेश लागू करण्यात आला होता. तरीसुद्धा या आदेशाला नजुमानता देशाचे पालन न करता लोक एकत्र आल्याने पोलीस प्रशासनाने अनेक लोकांवर गुन्हे दाखल केली आहे. याबाबतची प्रेस नोट सुद्धा जारी केली आहे.प्रेस नोट मध्ये अशाप्रकारे नमूद केले की, मौजे मारकडवाडी ता. माळशिरस गावातील ग्रामस्थ यांनी मा. तहसीलदार सो. यांना आमचे गावातील मतमोजणी योग्य पध्दतीने झाले नसुन आम्हाला ईव्हीएम मशिनवर संशय आसल्याने आम्हाला बैलेट पेपरवर फेर मतदान होणेबाबत परवानगी मिळावी. याकरिता अर्ज करण्यात आला होता. सदर अर्जावर मा. तहसिलदार सो व प्रांतअधिकारी सो. अकलूज यांचे कार्यालयाकडुन कळविण्यात आले की २५४ माळशिरस (अजा) विधानसभा निवडणुकीची प्रक्रीया दिनांक २३/११/२०२४ रोजी पार पडली असुन अशा पध्दतीने कोणत्याही गावाला फेर मतदान प्रक्रिया करता येणार नाही याबाबत स्पष्ट कळविले असुनही मारकडवाडी गावातील ग्रामस्थ हे मिडीया मार्फत दिनांक ०३/१२/२०२४ रोजी मतदान प्रक्रिया घेण्यावर ठाम होते. गावातील ग्रामस्त यांना पोलीस प्रशासनाने वारंवार अशा पध्दतीने आपण फेर मतदार प्रक्रिया पार पाडु नये याबाबत अवाहन करण्यात आले होते. त्याअनुषंगाने मा. उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी माळशिरस विभाग अकलुज घटना दिनांक-०२/१२/२०२४ ०५/१२/२०२४ या दरम्यान भारतीय संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मौजे मारकडवाडी या गावात जमावबंदी करण्यात आली होती. परंतु सदर गावातील ग्रामस्त यांनी मारकडवाडी गावात सकार्की ०७/०० वाजलेपासुन सुमारे २५० ते ३०० अंदाजे लोकांचा बेकायदेशीर जमाव जमवुन बैलेट पेपरवर मतदान करण्याची प्रक्रीया राबवण्याची तयारी केली होती. सदर अनुषंगाने तेथे मा. मा. उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी माळशिरस विभाग अकलुज यांचे आदेशान्वये कायदा व सुव्यवस्था कामी महसुल नायब तहसिलदार श्री सिध्दनाथ विठठल जावीर तहसील कार्यालय माळशिरस यांची नेमणुक करण्यात आली होती त्यांचे फिर्यादीवरून इसम नामे १) गौतम आबा माने रा. कन्हेर ता. माळशिरस, २) बाबा माने रा कन्हेर, ३) मारुती देशमुख रा माळशिरस, ४) युवराज झंजे रा मेडद ५) विष्णु नारणवर रा उंबरे दहिगाव ६) शामराव बंडगर रा तिरवंडी ७) कालिदास रुपनवर, ८) भानुदास सालगुडे रा सदाशिवनगर, ९) तुकाराम ठवरे रा खुडुस १०) बाजी माने रा कन्हेर, ११) दादा माने रा कन्हेर, १२) हनुमंत सरगर रा कचरेवाडी, १३) पांडुरंग वाघमोडे रा माळशिरस, १४) सोम नाथ पिसे रा पुरंदावडे १५) माणिक एकनाथ वाघमोडे रा माळशिरस, १६) हनुमंत ठवरे रा खुडुस, १७) तुकाराम देशमुख रा माळशिरस, १८) जावेद मुलाणी, १९) अजय सकट २०) आनंदा विष्णु मारकड रा मारकडवाडी २१) रणजित सरवदे, २२) रजनिश बनसोडे २३) साजन माने देशमुख २४) संतोष माने २५) अभिजीत साठे, २६) हनुमंत वायदंडे २७) हनुमंत भाऊ शेंडगे २८) बापु मुंगुसकर २९) स्वप्निल पवार सर्वे रा. वेळापुर ३०) स्वप्निल दत्तात्रय वाघमारे रा बागेचीवाडी अकलुज. ३१) रामा शेंडगे रा वेळापुर, ३२) बापु गायकवाड रा पिसेवाडी, ३३) बाबा तुपे रा वेळापुर, ३४) जब्बार मुलाणी रा वेळापुर, ३५) मामा पांढरे रा नातेपुते, ३६) नाथा रुपनवर रा



डोंबाळवाडी, ३७) नाना शिंदे रा पिरळे, ३८) प्रकाश कदम रा कदम वाडी ३९) सुनिल भालचंद्र पाटील रा फोंडशिरस ४०) बंडु पाटील रा फोंडशिरस ४१) संतोष सोपान वाघमोडे रा माळशिरस ४२) माऊली पाटील रा नातेपुते ४३) भिमराव नरुटे रा तामशिदवाडी ४४) विक्रम पाटील रा माळसिरस ४५) मनोज दडस रा बांगर्डे ४६) आप्पासाहेब देशमुख रा माळशिरस ४७) सचिन सावंत रा दहिगाव ४८) सर्जेराव जानकर रा माळशिरस ४९) संतोष देशमुख रा माळशिरस ५०) संतोष बंडगर रा खुडुस ५१) पिनु पाटील रा फोंडशिरस ५२) रोहिदास रणदिवे रा फॉडशिरस, ५३) किसन ढोबळे रा फोंडशिरस, ५४) रामा रणदिवे रा फोंडशिरस कोंडशिरस, ५५) दादा लोाळगे रा नातेपुते ५६) वैभव दादा रणदिवे रा फोंडशिरस ५७) दिपक दादा रणदिवे रा फोडशिरस ५८) दिपक रामा रणदिवे रा फॉडशिरस, ५९) अशोक बंडगर रा पाटील वरती अकलुन ६०) मोहण बापुराव झंजे रा मेडद, ६१) आप्पासाहेब पंढरीनाथ वाघमोडे रा मारकडवाडी ६२) सागर तानाजी मारकड रा मारकडवाडी ६३) रामदास शिवाजी काळे रा माळशिरस ६४) समादान भाऊ भोसले रा माळशिरस ६५) जिवन चाळासाहेब देवकाते रा धानोरे वेळापुर ६६) आण्णा मारुती हाक्के रा धानोरे वेळापुर ६७) नाथा सुरेश देवकाते रा धानोरे वेळापुर ६८) काकासाहेब पांडुरंग घुले रा वटपळी माळशिरस ६९) रामभाऊ आण्णा शेंडगे रा वटपळ माळशिरस ७०) बाजी पंढरीनाथ वाघमोडे वटपळी म ाळशिरस ७१) हनुमंत ज्ञानेश्वर लाळगे रा नातेपुते ७२) राहुल बाबासो बंडगर रा तिरवंडी ७३) पोपट बाबुराव विर रा अकलुज ७४) शशिकांत मेघराम दिक्षीत रा अकलुज ७५) प्रविण रमेश बागल रा अकलुज ७६) संतोष बाबुराव वाघमोडे रा फोंडशिरस ७७) योगेश नारायण ढोबळे रा फोंडशिरस ७८) संतोष लक्ष्मण वाघमोडे रा फोडशिरस ७९) सचिन मधुकर जाधव रा पुरदावडे ८०) दादा ज्ञानदेव चव्हाण रा पुरदावडे ८१) राजेश विष्णु चव्हाण रा पुरदावडे. ८२) गणेश विजय मारकड रा मारकडवाडी.८३) सागर बिचुकले रा नातेपुते ८४) प्रेम देवकाते रा नातेपुते. ८५) राजाभाऊ रुपनवर रा एकशिव. ८६) मा. आम दार श्री. उत्तमराव शिवदास जानकर रा वेळापुर ८७) रणजित मारकड रा मारकडवाडी. ८८) तेजस पाटील रा धर्मपुरी ८९) शहाजी बाळु वाघमोडे रा मारकडवाडीता. माळशिरस जि. सोलापुर असे व इतर काही लोक हे सकाळी ०८.०० वाचे सुमारास म ारकडवाडी गावातील ग्रामस्थ मतदान करण्यासाठी मौजे मारकडवाडी येथील ग्रामपंचायती समोर जमा होऊ लागले. तसेच त्यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी परगावाहुन लोक जमा झाले होते. त्यावेळेस वरील सर्व लोकांना आम्ही स्पिकर द्वारे जमावबंदीचा आदेश लागु असल्याचे पुन्हा पुकारले असता वरिल सर्व इसमांनी आप-आपसात व प्रशासनासोबत चर्चा केल्या नंतर त्यांनी ते आता चाचणी मतदान करणार नसले बाबत तोंडी कळवुन तेथुन निघुन गेले आहेत. म्हणुन वरील इसम यांचेविरूध्द दि. ०३/१२/२०२४ रोजी सकाळी ०८.०० वा. ते ११.३० वा.चे दरम्यान ग्रामपंचायत कार्यालय, मारकडवाडी ता. माळशिरस येथे मतदानासाठी व मतदानास पाठिंबा देण्यासाठी आलेले वरील सर्व इसम व इतर १०० ते १५०लोक जमा होऊन त्यांनी मा. उपविभागीय दंडाधिकारी, अकलुज यांचेकडील आदेश क्र. जबाबी/कावि-२२७५/२०२४अन्वये मौजे मारकडवाडी ता. माळशिरस जि. सोलापुर या गावच्या संपुर्ण क्षेत्रात दि ०२/१२/२०२४ रोजी सकाळी ०७.००वा. पासुन ते दि. ०५/१२/२०२४रोजी रात्री १२.०० वा. पर्यत सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रतिबंधात्म क उपाययोजना म्हणुन भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३चे कलम १६३ अन्वये जमावबंदी आदेश लागु असुन सुध्दा बेकायदेशीर जमाव जमवुन आदेशाचा भंग केला आहे म्हणुन नातेपुते पोलीस ठाणे गु.र.नं. ३९९/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३चे कलम बी.एन.एस. सन २०२३चे कलम ,१८९(१),१८९(२),१९०, २२३ महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### दक्षिण कोकण, मध्य महाराष्ट्रात पाऊस पडणार ? हवामान विभागाचा पावसाचा, थंडीचा अंदाज

मुंबई : 'फेंगल' चक्रीवादळामुळे राज्याच्या दक्षिणेकडील भागात बाष्पयुक्त वारे आल्यामुळे ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. दक्षिण कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पुढील दोन दिवस हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, 'फेंगल' चक्रीवादळामुळे राज्याच्या दक्षिण भागात ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे पुढील दोन दिवस दक्षिण कोकणातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग. मध्य महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांत हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हवामान विभागाने या जिल्ह्यांना पावसासाठी पिवळा इशारा दिला आहे. या जिल्ह्यांत मेधगर्जना, विजांच्या कडकडाटासह ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहून पाऊस पडण्याचा अंदाज आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेले आणि तमिळनाडूच्या किनारपट्टीवर धडकलेल्या फेंगल चक्रीवादळाची तीव्रता कमी झाली आहे. चक्रीवादळाने अरबी समुद्रात प्रवेश केल्यानंतरही त्याची तीव्रता वाढलेली नाही. त्यामुळे प्रामुख्याने महाराष्ट्रावर त्याचा विशेष परिणाम जाणवला नाही. पण, राज्याच्या बहुतांश भागांत ढगाळ वातावरण निर्माण झाल्यामुळे राज्यातील थंडी फेंगल चक्रीवादळाने घालवली आहे.

# भाजपच्या गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड होताच करमाळा भाजपकडून जल्लोष

## देवेंद्रजी फडणवीस आगे बढो, हम तुम्हारे साथ है, भारतीय जनता पार्टीचा विजय असो अशा घोषणांनी परिसर दुमदुमला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भाजप गटनेतीपदी देवेंद्रजी फडणवीस यांची निवड होताच करमाळा भाजपकडून मोठा जल्लोष करण्यात आला.

भारतीय जनता पार्टीचे नेते देवेंद्रजी फडणवीस यांची भाजपच्या घटनेतील निवड होताच करमाळ्यात भाजप कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांच्याकडून करमाळा भाजप संपर्क कार्यालयासमोर फटाके फोडून मोठ्या प्रमाणात जल्लोष साजरा करण्यात आला यावेळी देवेंद्रजी फडणवीस आगे बढो, हम तुम्हारे साथ है, भारतीय जनता पार्टीचा विजय असो अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता व गेली अनेक दिवस प्रलंबित असलेल्या भाजप विधिमंडळ पक्षनेता पदाची निवड आज मुंबई येथे भारतीय जनता पार्टीच्या सर्व आमदारांच्या बैठकीत झाली यावेळी पक्षाचे नेते देवेंद्र फडणवीस यांची भाजप गटनेतेपदी निवड झाली असून आता त्यांचे मुख्यमंत्रीपदी निश्चित झाले आहे.

यावेळी अक्षर तात्या जाधव, रामभाऊ ठाणे, जगदीश अग्रवाल, भावना गिरी गोसावी, काकासाहेब सरडे, अमोल पवार नितीन शिंगाडे प्रवीण बिनवडे गणेश महाडिक जयवंत काळे पाटील सोमनाथ घाडगे भैया राज गोसावी किरण शिंदे नितीन निकम नानासाहेब अनारसे दिनेश काळे बापू तांबे सचिन गायकवाड दत्तात्रय वाळूजकर संगीता नष्टे पूजा माने राजश्री खाडे चंपावती कांबळे कमलेश दळवी नागनाथ घाडगे सयाजी जाधव कपिल मंडलिक राजेश पाटील प्रकाश ननवरे सुभाष शिंदे गणेश झाकणे प्रसाद गेंड वसीदायम किरण बागल माने भैया कुंभार संजय किरवे शंभू किरवे संजय जमदाडे दादा गाडे अतुल इंदूरी दीपक शेळके भारत चोपडे विवेक अवसारे गणेश गोसावी विनोद इंदुरकर महादेव गोसावी भारत गुंड संतोष जवळकर आधी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होणार असल्याने पुन्हा एकदा महाराष्ट्रातील विकासाला दिशा मिळणार आहे असे मत गणेश चिवटे यांनी यावेळी व्यक्त केले पुढे बोलताना त्यांनी सांगितले की महाराष्ट्रातील जनतेने माननीय देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या विकासाला मत दिले आहे, येणाऱ्या काळात केंद्र सरकार व राज्य सरकारच्या माध्यमातून आपणही करमाळा तालुक्यातील विकासासाठी जास्तीत जास्त निधी आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची त्यांनी यावेळी सांगितले.**

# कल्याणशेट्टी महाविद्यालयात एड्स जनजागृती रॅली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी :

जागतिक एड्स जागृती दिनानिमित्त मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय रेड रिबीन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिनानिमित्त शहरात जनजागृती रॅली काढण्यात आली.

**स्वयंसेवकांनी घेतली एड्स जनजागृतीची शपथ रॅलीसाठी उपस्थित असणाऱ्या स्वयंसेवकांनी आपल्या परिसरात एड्स बाधित व्यक्ती दिसणार नाही त्यासाठी ग्रामस्थांचे प्रबोधन करू अशी शपथ घेतली.**

रॅलीचा प्रारंभ वैद्यकीय अधिकारी डॉ सतीश बिराजदार व संस्थेचे संचालक मल्लिनाथ मसुती यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, जुनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, प्रयोगशाळा तंत्रज्ञ राघवेंद्र करजगीकर, समुपदेशक मारुती धर्मसाले, वरिष्ठ क्षयरोग पर्यवेक्षक नजीर अहमद दलाल, एनजीओ प्रकल्प प्रमुख मल्लिकार्जुन पाटील, वरिष्ठ मलेरिया पर्यवेक्षक बसवराज



याबाजी आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना वैद्यकीय अधिकारी डॉ बिराजदार म्हणाले की, अक्कलकोट परिसरातील ग्रामीण भागात जनजागृती झाल्यामुळे एड्स रुग्णांचे प्रमाण कमी झाले आहे. एड्स चे प्रबोधना मुळे हे यश मिळाले आहे. समाजातील सर्व घटकांनी सामुदायिक प्रयत्न केल्यास एड्स रोगाचे निर्मूलन होईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

रॅलीचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा राजेश पवार व प्राध्यापिका शितल झिंगाडे- भस्मे यांनी केले, रॅलीमध्ये प्रा डॉ बाळासाहेब पाटील, प्रा भिम सोनकांबळे, प्रा मनीषा शिंदे यांच्यासह २१५ स्वयंसेवक उपस्थित होते.

या उपक्रमाबद्दल स्वयंसेवक व अधिकाऱ्यांचे आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी यानी अभिनंदन केले.

# आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बोडगांव देवी/प्रतिनिधी : अर्जुनी मोरगांव तालुक्याच्या प्राथमिक आरोग्य केंद्र चान्ना अंतर्गत उपकेंद्र डोंगरगाव च्या वतीने भारतीय आदिवासी आश्रम शाळा सिरेगावबांध येथील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

उपस्थित विद्यार्थ्यांची जलद ताप रूग्ण सर्वेक्षण व आरडीके तपासणी करण्यात आली आहे. ३६५ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी यावेळी करण्यात आली. परिसर स्वच्छतेविषयी यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.



विद्यार्थ्यांच्या वैयक्तीक स्वच्छतेसंबंधी आरोग्य शिक्षण देण्यात आले. तसेच इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष देण्याविषयी शाळा प्रशासनाला सूचना देण्यात आली आहे.

आरोग्य उपकेंद्र डोंगरगावचे सामुदायिक आरोग्य अधिकारी डॉ. बन्सोड यांच्यासह, आरोग्य पर्यवेक्षक राऊत,आरोग्य सेवक सातारे,पिपरे,बनकर,आरोग्य सेविकाकाटवले यांनी यावेळी संदर्भ सेवा प्रदान केली.

# आमदार दत्तात्रय भरणे यांना कॅबिनेट मंत्रीपद मिळावे यासाठी श्री बिरोबा देवास दुग्धाभिषेक करत घातले साकडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे इंदापूर चे आमदार दत्तात्रय भरणे यांना कॅबिनेट मंत्रीपद मिळावे याकरिता सिनेअभिनेते बाबा गायकवाड यांनी भरणेवाडी (ता. इंदापूर) येथे आ.भरणे यांचे कुलदैवत श्री बिरोबा चरणी साकडे घालत दुग्ध अभिषेक केला.



प्रसंगी बाबा गायकवाड म्हणाले की,दत्तामामा भरणे हे कॅबिनेट मंत्री व्हावे याकरिता बिरोबा चरणी अभिषेक घातला. आमचे श्रद्धास्थान असलेले बिरोबा दैवत नेहमीच मामांच्या पाठीशी आहे.यापूर्वी ५० किलोमीटर पायी वारी करून श्री केदारनाथ चरणी दत्तामामा आमदार व्हावे याकरिता मागणी केली होती ती मागणी पूर्ण झाली. मी सिनेअभिनेता असलो तरी राजकारण आणि सिनेसृष्टी ही वेगवेगळी दुनिया आहे. राजकारण राजकारणाच्या ठिकाणी राहील पण दत्ता मामांवर माझे वैयक्तिक प्रेम आहे. मी आज जो काही आहे तो फक्त दत्तामामांमुळे आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी माझे कुटुंब काहीही करू शकते.

# विद्यार्थ्यांनो यशस्वी जीवनासाठी इंग्रजी भाषा महत्वाची : जी. सिद्धार्थ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी

आपल्या आईवडिलां स्वप्न साकार करण्यासाठी विद्यार्थ्यांनी कष्ट घ्यावेत मेहनत व स्वतःवर विश्वास असावा तसेच यशस्वी जीवनात इंग्रजी भाषा येणे अत्यंत गरजेचे असून ती भाषा आत्मसात करण्यासाठी प्रयत्न करावे असे मार्गदर्शन इंग्रजी भाषेचे प्रख्यात मार्गदर्शक जी सिद्धार्थ यांनी केले.

लोहा शहरातील जिज्ञासा अभ्यासिका व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र येथे विध्यार्थ्यांना जी सिद्धार्थ यांनी इंग्रजी भाषा कशी आत्मसात करावी या भाषेत कसे



बोलावे याचे हसत खेळत मार्गदर्शन केले .इंग्रजी भाषा आपणास आली पाहिजे असे प्रत्येकास वाटते पण त्यासाठी आपण प्रयत्न करत नाही .फार अवघड भाषा आहे असा समज झालेला असतो स्पर्धा परीक्षा तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयात गुण कमी येतात त्यामागची कारणमीमांसा सांगताना अनेक उदाहरणे त्यांनी दिली.आई वडिलांच्या स्वप्नपूर्ती साठी व भविष्यासाठी आपण एकाग्रता ठेवून अभ्यास करावा यश हमखास मिळेल तसेच इंग्रजी भाषा अवगत होते काळाची गरज आहे त्या भाषेचे महत्व सांगितले तसेच शरीरावर इंग्रजी भाषा कशी बोलली जाते त्याचे ट्रॅक त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले .इंग्रजी भाषा यशस्वी जीवनासाठी महत्वाची आहे असे जी सिद्धार्थ यांनी मार्गदर्शन केले. जिज्ञासा अभ्यासिकेचे संस्थापक हरिहर धुतमल यांनी प्रास्ताविक केले .तर अभ्यासिकेच्या वतीने जी सिद्धार्थ यांचा सत्कार करण्यात आला. व्यवस्थापक बालाजी धनसडे व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**पावने दोन महिने राहाणार वास्तव्य**

**येत्या पोर्णिमेला दर्शनासाठी लाखों भावीक दाखल होण्याची शक्यता**

# नळदुर्ग मैलारपूर येथील लाखों भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या खंडोबारायांची मुर्ती विराजमान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्गच्या एतिहासिक पवित्र नगरीत दि ३ डिसेंबर रोजी पाहाटे ५ च्या सुमारास ढोल ताशाच्या गजरात व यळकोट येडकोट जय मल्हार च्या जय घोषात पालखीतुन आगमन झाले. यावेळी अनेक भाविक भक्तानी दर्शन घेतले आणि विधीवत पुजा करून खंडोबारायाच्या मुर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली .

यावेळी नळदुर्ग येथील मानकरी नागरिक खुप मोठया प्रमाणात उपस्थित होते. अणदूर येथील खंडोबा मंदिरात भाविकांची खुप मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती परिसरातील भावीक भक्तांनी अणदूर नगरीत जाऊन श्री खंडोबा रायाचे






दर्शन घेतले आहे . त्यानंतर खंडोबा रायाची मुर्ती पालखी मधुन नळदुर्ग येथील ऐतिहासिक मैलारपूर नगरीत आगमन होताच नळदुर्ग मध्ये ढोल तशाच्या गरजरात शोभेची दारू सह जल्लोषात स्वागत करण्यात आले ही पालखी राष्ट्रीय हायवे वरून मैलारपूर कडे मार्गक्रमण करीत भक्तानी दोन्ही बाजुनी दर्शनासाठी गर्दी केली होती . यावेळी नळदुर्ग अणदूर सह परिसरातील नागरीक भक्त उपस्थित होते .

श्री खंडोबारायाची मुर्ती प्रतिष्ठापना झाल्या पासुन पावने दोन महिने नळदुर्ग ऐतिहासिक नगरीत वास्तव्यास मुर्ती ठेवण्यात आली आहे यानंतर श्री खंडोबाच्या दर्शनासाठी महाराष्ट्र कर्नाटक , मध्य प्रदेश , आध्रा प्रदेश आदि प्रांतातून पोर्णिमा पर्यंत लाखोंच्या संख्येने भाविक भक्त नळदुर्गच्या पावन नगरीत दाखल होण्याची दाट शक्यता आसल्याने नळदुर्ग येथील पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे सहाय्यक पोलीस निरीक्षक कांगुणे पोलीस उप निरीक्षक इश्वर नांगरे यांच्या मार्ग दर्शनाखाली जीवीशाचे धनंजय वाघमारे सह पोलीसांचा

चोख बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे



# एकुरगा येथील शाळेच्या विद्यार्थ्यांनी घेतला सहलीचा आनंद

दैनिक यशसिद्धी न्यूज नेटवर्क

उमरगा/ प्रतिनिधी : उमरगा तालुक्यातील एकुरगा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थी तीन दिवसाच्या शैक्षणिक सहलीसाठी कोकण विभागात गेले होते. सहलीत विद्यार्थ्यांनी कन्हेरी मठातील तारांगणात प्रत्यक्ष ग्रह, तारे पाहीले. ७ D थिएटर मध्ये तंत्रज्ञानाच्या मदतीने चित्तथरारक अनुभव घेतला. ग्रामीण भागातील विविध कारागीर व भटक्या लोकांचे जीवन जवळून पाहिले. न्यू पॅलेस मध्ये विविध शस्त्रे व प्राण्यांची माहिती घेतली. पन्हाळा किल्ला राधानगरी धरण पाहून कुणकेश्वर येथील बीचवर समुद्री लाटांचा आनंद घेतला. सिंधुदुर्ग किल्ला, छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीची प्रचिती विद्यार्थ्यांना आली.या तीन दिवसाच्या सहलीत विद्यार्थ्यांनी पर्यटन करतानाच शैक्षणिक, धार्मिक, विज्ञान, इतिहासविषयक संकल्पना समजून घेतल्या. सहलीच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक जाधव के. बी. केंद्रप्रमुख पी.डी पांचाळ सहल प्रमुख आर. एन कोराळे, श्रीमती एस सी चव्हाण श्रीमती पीडी काळे यांनी प्रयत्न केले.इराप्पा आगलावे सह शालेय व्यवस्थापन समिती व पालकांनी सहकार्य केले. ग्रामीण भागातील या उपक्रमाशील शाळेतील ही शैक्षणिक सहल अविस्मरणीय ठरली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'महापरिनिर्वाण दिनानिमित्त' 'माहिती व जनसंपर्क'तर्फे अनोखी मानवंदना

## ई माहितीपट आणि चित्रपटाचे महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांवरुन प्रसारण होणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'महापरिनिर्वाण दिनानिमित्त' शुक्रवार, दि. ६ डिसेंबर २०२४ रोजी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावर आधारित दोन माहितीपटांसह आणि चित्रपटाचे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांवरून प्रसारण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांच्या माध्यमातून महासंचालनालयातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनोखी मानवंदना देण्यात येणार आहे.

'महापुरुष डॉ.आंबेडकर' या माहितीपटाचे प्रसारण सकाळी ११ वा. आणि 'बाबासाहेब आंबेडकर' या माहितीपटाचे प्रसारण दुपारी १ वाजता तसेच 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : द अनटोल्ड ट्रुथ' या चित्रपटाचे प्रसारण दुपारी ४ वाजता करण्यात येणार आहे. माहितीपट व चित्रपटाच्या प्रसारणाच्या माध्यमातून महासंचालनालयाने डॉ. आंबेडकर यांना अनोखी आदरांजली वाहिली आहे.

महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांच्या पुढील लिंकवर हे कार्यक्रम पाहता येतील.

एक्स – https://x.com/MahaDGIPR

फेसबुक – https://www.facebook.com/MahaDGIPR

यू ट्यूब – https://www.youtube.co/MHR-SHTRDGIPR

'महापुरुष डॉ. आंबेडकर' माहितीपटाचे सकाळी ११ वा. प्रसारण

'महापुरुष डॉ. आंबेडकर' या दुर्मिळ माहितीपटाचे प्रसारण सकाळी ११ वाजता. महासंचालनालयाच्या एक्स, फेसबुक आणि युट्यूब या समाजमाध्यमांवरुन करण्यात येणार आहे. डॉ. आंबेडकर यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटनांचे चित्रण तसेच, लाईव्ह फुटेजच्या चित्रीकरणाचा समावेश या १७ मिनिटांच्या माहितीपटात करण्यात आला आहे. डॉ. आंबेडकरांच्या आयुष्यावर प्रकाश टाकणारा एक महत्त्वाचा ऐतिहासिक दस्तावेज जुलै १९६८ मध्ये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने फिल्म्स डिव्हिजनच्या माध्यमातून तयार केला आहे.

या माहितीपटात डॉ. आंबेडकर यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केल्याची ऐतिहासिक घटना दृश्य आणि त्यांची नेपाळ भेट तसेच मुंबईतील दादर चौपाटीवरील त्यांच्या अंतिम दर्शनाचे क्लोजअप शॉट्स आहेत. मधुकर खामकर यांनी छायांकन केले आहे. जी.जी. पाटील यांनी संकलन केले आहे. दिग्दर्शक नामदेव व्हटकर हे मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते आणि दिग्दर्शक होते. हा दुर्मिळ माहितीपट व्हटकर प्रॉडक्शनच्या बॅनरखाली नामदेव व्हटकर यांनी दिग्दर्शित केला आहे. तर संगीत दत्ता डावजेकर यांचे आहे. ज्येष्ठ चित्रपट कलाकार डेव्हिड अब्राहम या चित्रपटाचे निवेदक होते.

'बाबासाहेब आंबेडकर' माहितीपटाचे दुपारी १ वा. प्रसारण

भारत सरकारच्या 'फिल्म्स डिव्हिजन' ची निर्मिती असलेल्या 'बाबासाहेब आंबेडकर' या माहितीपटाचे प्रसारण दुपारी १ वाजता महासंचालनालयाच्या एक्स, फेसबुक आणि युट्यूब या समाजमाध्यमांवरुन करण्यात येणार आहे. 'फिल्म्स डिव्हिजन'च्या वतीने एन.एस. थापा यांनी १९८१ मध्ये या माहितीपटाची निर्मिती केली आहे. या चित्रपटाला ए.वी. भाष्यम यांचे दिग्दर्शन लाभले आहे.

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : द अनटोल्ड ट्रुथ' या चित्रपटाचे दुपारी ४ वा. प्रसारण

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : द अनटोल्ड ट्रुथ' या चित्रपटाचे प्रसारण दुपारी ४ वाजता महासंचालनालयाच्या एक्स, या समाजमाध्यमावरुन करण्यात येणार आहे. सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन यांनी या चित्रपटाची संयुक्तरित्या निर्मिती केली आहे.

स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध क्षेत्रातील कार्य अतुलनीय आहे. प्रचंड बुद्धिमत्ता असणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. समाजामधील तळागाळातील व्यक्तींचा त्यांनी प्रामुख्याने विचार केला. शिक्षण व समाजाच्या कल्याणासाठी आयुष्यभर संघर्ष केला. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा', असा मंत्र दिला. अशा असामान्य कर्तृत्व गाजवणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य समजून घेण्यासाठी हा चित्रपट नक्की पहायला हवा.

या चित्रपटाचे दिग्दर्शन जब्बार पटेल यांनी केले आहे. या चित्रपटात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रमुख भूमिका अभिनेता मामूट्टी यांनी तर रमाबाई आंबेडकर यांची भूमिका सोनाली कुलकर्णी यांनी साकारली आहे. मोहन गोखले, मृणाल कुलकर्णी यांच्या देखील या चित्रपटात भूमिका आहेत. निर्मिती सहाय्य राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ (एनएफडीसी) यांनी केले असून पटकथा लेखन सोनी तारापोरवाला, अरूण साधू, दया पवार यांनी केले आहे. चित्रपटाचे संशोधन डॉ. य. दि. फडके यांनी केले. सल्लागार श्याम बेनेगल आहेत, चित्रपटाची वेशभूषा भानु अथैय्या, संगीत अमर हल्दीपूर, फोटो दिग्दर्शन अशोक मेहता यांचे आहे.

# अकलूजमध्ये रयतेचा राजा शिवछत्रपती महानाट्यातून उलगडला शूरवीरांचा इतिहास



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त दिनांक ०२ व ०३ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित केलेल्या रयतेचा राजा- राजा शिवछत्रपती या महानाट्यातून छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या सहकार्यांच्या पराक्रमांचा ज्वलंत इतिहास उलगडला.हजारों रसिकांनी याला भरभरुन दाद दिली.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती अकलूज,शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज व सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना कामगार वर्ग यांचे वतीने श्री विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकूल, अकलूज येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या वेळी सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुलक्षणादेवी मोहिते पाटील, अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ कांचनमालादेवी मोहिते पाटील या बंधूंच्या अमृतमहोत्सवी वाटचाली निमित्त त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.त्यांना चांदीची तलवार व संग्रामसिंह मोहिते पाटील मित्र मंडळाच्या वतीने चांदीचा लेझीम भेट देण्यात आला.

यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील,सौ. नंदिनीदेवी मोहिते पाटील प्रमुख उपस्थित होते.शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील,सौ ऋतुजादेवी मोहिते पाटील,सौ सुमित्रादेवी खानविलकर,कु.स्वरूपाराणी मोहिते पाटील,चि.सयाजीराजे मोहिते पाटील,व्हा.चेअरमन शंकरराव माने देशमुख,सचिव अभिजीत रणवरे,सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील,कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले आदी मान्यवर उपस्थित होते.

या सत्काराला उत्तर देताना जयसिंह मोहिते पाटील म्हणाले की,मागील पन्नास वर्षाच्या कालावधीमध्ये अनेक लहान मोठ्या कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.त्यापैकी बरेच जण आज अस्तित्वात नाहीत.त्यांच्यामुळेच मी माझ्या आयुष्यातील काही चांगल्या गोष्टी करू शकलो. रयतेचा राजा शिवछत्रपती हे केवळ करमणुकीसाठी नाट्य नाही,तर यातून आपण चांगल्या गोष्टी अंगीकारल्या पाहिजेत. शिवाजी महाराजांनी लाखमोलाचे सहकारी निर्माण केले. छत्रपती शिवाजींनी रयतेच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत पेटवली व त्यांच्या पश्चात ती २७ वर्ष धगधगत राहिली. शिस्त,कष्ट,जिद्द व स्वाभिमान हे या नाटकातून शिकले पाहिजे. प्रत्येकाच्या मनात ज्वलंत देशभक्ती निर्माण व्हावी यासाठीच या महानाट्याचे आयोजन केले.सर्वांनी स्वाभिमान टिकवण्यासाठी शिवाजी महाराजांचे गुण अंगीकारले पाहिजेत.

या महानाट्यासाठी क्रीडा संकुलवर उभारलेल्या १२५ फुट लांब व ७० फुट रुंद अशा भव्य रंगमंचावर शिवाजी महाराजांच्या भूमिकेत चित्रपट कलावंत शंतनू मोघे, जिजाऊंच्या भुमिकेत अभिनेत्री पल्लवी वैद्य, बाजी प्रभूंच्या भुमिकेत अभिनेते रवींद्र कुलकर्णी आणि अफजल खानाच्या भूमिकेत अभिनेते विश्वजीत फडते यांच्यासह स्थानिक ९०० हून अधिक कलाकारांनी सहभाग घेतला. याचे लेखक युवराज पाटील, दिग्दर्शक अभिनेते अजय तपकिरे,सुत्रधार डॉ.विश्वनाथ आवड होते.

शिवजन्मपूर्व कालापासून ते शिवराज्याभिषेकापर्यंतचे महत्वाचे प्रसंग या महानाट्यातून साकारले.यात अल्लाउद्दीन खिलजीची स्वारी,स्वराज्य संकल्पक शहाजीराजे व जिजाऊ माँसाहेब यांनी पाहिलेले स्वराज्याचे स्वप्न, शिवजन्म- बारसे,बालशिवाजीचे शिक्षण, स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा, रांजाच्या पाटलाला सुनावलेली शिक्षा,प्रतापगडावरील पराक्रम, पन्हाळ्याहून सुटका, शिवा काशिदचे व बाजीप्रभूचे आत्मबलीदान,बहलोल खानाचा प्रसंग व सेनापती प्रतापराव गुजर यांची आत्माहुती,गड आला पण सिंह गेला व शेवटी शिवराज्याभिषेक इत्यादी प्रसंग हुबेहूब साकारले.यामधील पायदळ व घोडदळाचा प्रत्यक्ष सहभाग यामुळे या महानाट्याने प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतला.

# पशुसंवर्धन विभागांतर्गत वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद सोलापूर यांच्यामार्फत सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा वार्षिक योजनेमधून वैयक्तीक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येतात यासाठी पात्र लाभार्थींना २० डिसेंबर २०२४ पर्यंत अर्ज सादर करावेत असे, आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. एन. एल, नरळे यांनी केले आहे.

जिल्हा वार्षिक योजनेतून दुभत्या जनावरांना खाद्य उपलब्धतेसाठी सुधारणा कार्यक्रम, वैरण व पशुखाद्य कार्यक्रम अंतर्गत ५० टक्के अनुदानावर मुरघास निर्मितीस प्रोत्साहन देऊन त्याअंतर्गत सायलेज बॅग खरेदी करणे तसेच खनिज मिश्रण वापरासाठी कमाल ०२ दूधाळ पशुधनासाठी ३३ टक्के अनुदान वाटप करण्यात येणार आहे

या योजनांसाठी पात्र लाभार्थीकडुन अर्ज मागविण्यात येत असून सदरचे अर्ज पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती व सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये उपलब्ध आहेत. तसेच जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर (ु.ीश्रिरीीि) उपलब्ध आहेत. अर्ज स्वीकारण्याची अंतीम तारीख दिनांक २० डिसेंबर २०२४ आहे.

तरी इच्छुक पात्र लाभार्थींनी वरील योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहनही कृषी पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीचे अध्यक्ष, तथा अति. मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. एन. एल, नरळे यांनी यांनी केले आह

# कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत दारिद्रय रेषेखालील भूमिहिन शेतमजूर अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांना २ एकर बागायत किंवा ४ एकर जिराईत जमीन १०० टक्के अनुदान स्वरुपात खरेदी करुन देण्यात येत असल्याची माहिती समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी दिली आहे.

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी अनुसुचित जातीचा दारिद्र्य रेषेखालील .व कुटुंब प्रमुखाचे वय ६० वर्षापेक्षा जास्त आहे. अशा कुटुंबातील ६० वर्षापेक्षा कमी वय असणाऱ्या कुटुंबा प्रमुखाच्या पत्नीला या योजनेचा लाभ घेता येईल. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी विक्रिसाठी जमीन उपलब्ध असलेल्या गावाचा रहिवाशी असावा. प्रस्तुत योजनेंतर्गत ज्या गावात जमीन उपलब्ध आहे त्याच गावातील पात्र लाभार्थ्यांची प्रथम निवड करण्यात येईल व त्या गावातील लाभार्थी उपलब्ध नसल्यास लगतच्या इतर गावातील पात्र लाभार्थ्यांना जमीनीच्या उपलब्धतेनुसार चिठ्या टाकून जिल्हा समितीच्या मान्यतेने विहित कार्यपध्दती नुसार पारदर्शक पध्दतीने लाभ देण्यात येईल.

दारिद्र्य रेषेखालील भूमीहिन अनुसुचित जाती तथा नवबौध्द प्रवर्गातील परित्यक्ता स्त्रिया , दारिद्र्य रेषेखालील भूमीहिन अनुसुचित जाती तथा नवबौध्द विधवा स्त्रिया, अनुसुचित जाती /जमाती कायद्यांतर्गत जातीचे आत्याचारग्रस्त या घटकांना लाभार्थी निवडीमध्ये प्राधान्य देण्यात येईल. महसुल विभागाने गायरान व सिलिंगच्या जमिनीचे वाटप केलेल्या कुटूंबांना लाभ अनुज्ञेय नाही. या योजनेंतर्गत जमीनीचे वाटप झाल्यानंतर संबंधित लाभ धारकाने स्वता: जमीन कसणे आवश्यक आहे. सदर जमीनीचे अन्य व्यक्तीस, संस्थेस हस्तांतरण व विक्री करता येणार नाही तसेच लीजवर भाडेपट्याने देता येणार नाही.

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांना लाभ देण्यासाठी जिल्हा समाज कल्याण कार्यालयास जमीन खरेदी करावयाची आहे. जमीन कसण्यास अयोग्य, डोंगर उताराची, खडकाळ व नदी पात्रा जवळच्या क्षारयुक्त व क्षारपड जमीन असू नये. जमीन सलग असावी, शेत जमीन विना बोजा व कुळ नसलेली असावी तसेच जमीन कोठेही गहाण अथवा वादग्रस्त नसावी.जमीन विक्रीच्या अर्जावर शेतजमीन विक्री करणाऱ्या जमीन मालकाशिवाय संबंधिताच्या कुटुंबातील दोन व्यक्तींची जमीन विक्रीस संमतीबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. जे जमीन मालक जिरायत जमीन कमाल ५ लाख रुपये प्रती एकर व बागायत जमीन कमाल ८ लाख रुपये प्रती एकर प्रमाणे विक्री करण्यास तयार आहेत अशा जमीन मालकांनी जमीनीच्या ७/१२ व आवश्यक कागदपत्रासह सहाय्यक आयुक्त् समाज कल्याण, कार्यालय, सोलापूर यांचेशी संपर्क साधावा.

तसेच सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी अनुसुचित जाती नवबौध्द घटकातील पात्र लाभार्थ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज सहायक आयुक्त समाज कल्याण सोलापूर यांच्या कार्यालयाकडे दाखल असे आवाहनही समाज कल्याणचे सहायक आयुक्त श्रीमती सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.

# आमदार राणाजगजितसिंह पाटील यांना मंत्रीपद मिळावे म्हणून वागदरीत ग्रामदैवत श्री संत भवानसिंग महाराज यांना साकडे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी(एस.के.गायकवाड) : तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा विजय होऊन आमदार झालेले राणाजगजितसिंह पाटील उर्फ राणा दादा यांना महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात समावेश करण्यात यावे.त्यांना मंत्री पद मिळावे यासाठी तुळजापूर तालुक्यातील मौजे वागदरी येथील ग्राम दैवत श्री संत भवानसिंग महाराज मंदिरात महाआरती करून भगवंताना भाजपा कार्यकर्त्यांनी साकडे घातले.

राष्ट्रीय काँग्रेसचा बालेकिल्ला समजला जाणाऱ्या तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून महायुतीच्या माध्यमातून निवडणूक लढवून भाजपचे राणाजगजितसिंह पाटील यांनी सलग दुसऱ्यांदा विजय संपादन करून धाराशिव जिल्ह्यातील राजकीय इतिहासात आपले वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे.धाराशिव जिल्ह्यातील एकूण चार विधानसभा मतदारसंघ आहेत.त्यापैकी दोन जागा महायुतीला तर दोन जागा महविकास आघाडीला मिळाल्याने जिल्ह्यातील राजकीय बलाबल समान राहीले आहे. त्यात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे कार्य केवळ तुळजापूर विधानसभा मतदारसंघा पुरतेच मर्यादित नाही तर धाराशिव जिल्ह्यातील सर्व घटकां पर्यंत पोहोचलेले आहे. त्याना महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून तर धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून संधी दिल्यास धाराशिव जिल्ह्याचा कायापालट होणार यात शंका नाही.म्हणून आमदार राणा दादा यांना मंत्री पद मिळावे यासाठी वागदरी येथे भाजपचे तालुका उपाध्यक्ष किशोर सुरवसे व वागदरी बुथ प्रमुख मदन पाटील यांनी येथील ग्राम दैवत श्री संत भवानसिंग महाराज मंदिरात महाआरती करून भगवंताना साकडे घातले आहे.

सर्वोत्कृष्ट प्रशिक्षण संस्था पुरस्कार

### संस्थेला अनेक पुरस्काराने गौरविले

# सर्वाधिक प्रवेशासाठी पंढरपूरच्या आयआयटीचा एमकेसीएलकडून गौरव




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सन २०२४ मध्ये पंढरपूर येथील आयआयटी कॉम्प्युटर सेंटरला एमएससीआयटी संगणक कोर्ससाठी महाराष्ट्रातून सर्वाधिक प्रवेश दिल्याबद्दल महाराष्ट्र ज्ञान महामंडळ म्हणजेच एमकेसीएलकडून राज्यस्तरीय नंबर १ चा दिला जाणारा सर्वोत्कृष्ट प्रशिक्षण संस्था पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

महाराष्ट्र ज्ञान महामंडळाची विभागीय बैठक सोलापूर येथील निर्मलकुमार फडकुले सभागृहात दि. ३ डिसेंबर रोजी पार पडली. हा पुरस्कार एमकेसीएलच्या मॅनेजिंग डायरेक्टर वीणा कामथ यांच्या हस्ते देण्यात आला. हा पुरस्कार आयआयटी कॉम्प्युटर सेंटरचे संचालक नितीन आसबे व दत्ता कळकुंबे यांनी स्वीकारला. पंढरपूर येथील आयआयटी संगणक प्रशिक्षण संस्था मागील २४ वर्षांपासून पंढरपूर येथे विद्यार्थ्यांना संगणकाचे धडे देत आहे. यापूर्वीही या संस्थेला अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. यावर्षी एमएस-सीआयटी रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण करीत विद्यार्थी हिताचे प्रसिक्षण दिले. शासनाकडून आलेले सारथी, अमृतकलश, यासारखे वेगवेगळे प्रशिक्षण सर्वसामान्य गोरगरीब होतकरू विद्यार्थांना देवून नोकरीला लावले व विद्यार्थांचा विश्वास संपादन केल्या बद्दल सन्मान करण्यात आला.

या यशामागे रोहिणी मांजरे, वैष्णवी पाटील व आयआयटी संगणक प्रशिक्षण संस्थेतील इतर शिक्षकांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. पुरस्कार प्रदान करतेवेळी एमकेसीएलचे विभागीय सरव्यवस्थापक अतुल पतोडी, अमित रानडे, डॉ. दीपक पाटेकर, श्री.कौशल, श्री.कुंभार,श्री.कटकधोंड, विभागीय समन्वयक श्री महेश पत्रीके, लोकल लीड सेंटर चे रोहित जेऊरकर, हारून शेख, मलिक शेख, शिवानंद पाटील व सोलापूर जिल्ह्यातील सर्व संगणक संस्था चालक उपस्थित होते.